वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-शनिवार दि.६ डिसेंबर २०२५ पाने ४ किंमत ३

## अयोध्याचे प्रभू श्रीराम मंदिर पूर्ण झाले पण

# निकालाला पाच वर्षे होऊनही मशिदीचं बांधकाम का होईना?



Email:- dailydivyawarta@Gmail.com
Email:-editordivyawarta@gmail.com

दिव्य वार्ता



### ट्रस्टमधील मतभेद आणि निधीची कमतरता यामुळे मशिदीची स्थापना रखडली, इंडो-इस्लामिक कल्चरल फाउंडेशन ची ग्वाही

दिल्ली, (वृत्तसेवा):- अयोध्येतील राम मंदिराचं बांधकाम पूर्ण झालं आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २५ नोव्हेंबर २०२५ रोजी ध्वजारोहण करून हे बांधकाम पूर्ण झाल्याची घोषणा केली.दुसरीकडे, मशिदीचं बांधकाम अद्यापही सुरू झालेलं नाही.२०१९ च्या 'अयोध्या वादा'च्या निकालामध्ये सर्वोच्च न्यायालयानं असं स्पष्ट केलं होतं की, अयोध्येमध्ये मशिदीसाठीही जागा दिली जावी. त्यानंतर, २०२० मध्ये सरकारने अयोध्येपासून अंदाजे २०-२५ किलोमीटर अंतरावर असलेल्या धनीपूर गावामध्ये ५ एकर जमीन देऊ केली होती.

सुन्नी सेंट्रल वक्फ बोर्डाने मशिदीच्या बांधकामाचं नियोजन करण्यासाठी 'इंडो-इस्लामिक कल्चरल फाउंडेशन' नावाचा एक ट्रस्ट स्थापन केला होता. मात्र, तिथे अद्याप कोणतंही पायाभूत काम सुरू होऊ शकलेलं नाही.या जागेवर मशीद न बांधली जाण्यामागे अनेक कारणं सांगितली जात आहेत. यामध्ये अयोध्येपासूनचे अंतर, ट्रस्टमधील मतभेद आणि निधीची कमतरता अशा गोष्टींचा समावेश आहे. ट्रस्टचा नकाशा देखील रद्द करण्यात आला आहे.ट्रस्टचे अध्यक्ष जफर अहमद फारुकी म्हणाले, ट्रस्टकडे पैसे नाहीत. त्यामुळे काम सुरू होऊ शकत नाहीये.जमिनीचं वाटप झाल्यानंतर कोविड सुरू झाला. त्यामुळे सगळ्याच गोष्टींना उशीर होत गेला. मग आम्ही नकाशा फायनल केला. मात्र, जेव्हा आम्ही तो नकाशा घेऊन बाहेर पडलो आणि भारतातील अनेक लोकांशी बोललो, तेव्हा त्या डिझाइनवर आक्षेप घेण्यात आले, असंही त्यांनी नमूद केलं.

बोर्डाने असा दावा केला की, १९४९ पर्यंत बाबरी मशिदीत नमाज पठण केलं जात होतं. मात्र, २२-२३ डिसेंबर १९४९ रोजी हिंदू पक्षाने तिथे मूर्ती ठेवल्या. त्यानंतर सरकारकडून ते कुलूपबंद करण्यात आलं.या वादाच्या केंद्रस्थानी १६ व्या शतकातील बाबरी मशीद होती. हिंदू पक्षाने असा दावा केला होता की, इथे हिंदू मंदिर पाडल्यानंतर त्यावर ही मशीद बांधण्यात आली आहे.

३० सप्टेंबर २०१० रोजी, अलाहाबाद उच्च न्यायालयाने अयोध्या वादावरील निर्णयात सुन्नी सेंट्रल वक्फ बोर्डाचा दावा मान्य केला. त्यांना वादग्रस्त २.७७ एकर जमिनीपैकी एक तृतीयांश जमीन देण्यात आली. उर्वरित जमीन हिंदू पक्षांना मिळाली.या निर्णयाला सर्व पक्षांनी सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिलं. २०१९ मध्ये सर्वोच्च न्यायालयानं संपूर्ण जमीन 'राम लल्ला विराजमान' यांच्याकडे सोपवली. न्यायालयानं सुन्नी सेंट्रल वक्फ बोर्डाला मशिदीच्या बांधकामासाठी अयोध्येत ५ एकर पर्यायी जमीन देण्याचे आदेश दिले.सर्वोच्च न्यायालयानं आपल्या आदेशात म्हटलं होतं, केंद्र सरकारनं १९९३ मध्ये अधिग्रहित केलेल्या जमिनीतून ५ एकर जमीन सुन्नी सेंट्रल वक्फ बोर्डाला द्यावी किंवा राज्य सरकारने अयोध्येतील एका प्रमुख ठिकाणी जमीन द्यावी.

▶▶ पान २ वर सविस्तर वाचा

## शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या मागण्यांचा शासनाने विचार करावा



### आ.संदीप क्षीरसागरांची शासनाकडे मागणी

बीड, (दिव्य न्युज):- महाराष्ट्रातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी विविध मागण्यांसाठी आंदोलन पुकारले होते. या आंदोलनामध्ये महाराष्ट्र राज्यातील प्राथमिक शिक्षक, माध्यमिक शिक्षक, उच्च माध्यमिक शिक्षक, मुख्याध्यापक, संस्थाचालक व शिक्षकेत्तर कर्मचारी सहभागी झालेले आहेत.

आ.संदिप क्षीरसागर यांनी सदरील आंदोलनाची दखल घेवून शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या मागण्या मान्य कराव्यात अशी मागणी राज्य शासनाकडे केली आहे. मा.सर्वोच्च न्यायालयाच्या ढएढ विषयक अनिवार्यतेच्या निर्णयास अनुसरून पुर्नविचार याचिका दाखल करावी, शिक्षण सेवक योजना रद्द करून नियमीत

▶▶ पान २ वर

## खा.सोनवणेंनी प्रश्न मांडला अन् वक्फ मालमत्ता नोंदणीला मिळाला मोठा दिलासा

### सरकारकडून पुढचे तीन महिने दंडमुक्ती



बीड , (दिव्य न्युज):-वक्फ (दुरुस्ती) कायदा २०२५ अंतर्गत 'उम्मीद पोर्टल'वर मालमत्ता नोंदणीसाठी दिलेल्या सहा महिन्यांच्या मुदतीचा कालावधी दि.५रोजी संपला असला, तरीही केंद्र सरकारने मुतवल्ली व वक्फ संस्थांसाठी मोठा दिलासा जाहीर केला आहे. केंद्रीय अल्पसंख्यक कल्याण व संसदीय कार्य मंत्री किरण रिजिजू यांनी पुढील तीन महिने कोणताही दंड किंवा कठोर कारवाई न करण्याचा निर्णय जाहीर करताच वक्फ समुदायात समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. खा.बजरंग सोनवणे यांनी मुदतवाढ मिळावी, यासाठी पत्र दिले होते. यानंतर हा निर्णय झाला आहे.

याबाबत बोलताना मंत्री रिजिजू म्हणाले, 'मार्च २०२६ पर्यंत उम्मीद पोर्टलवर नोंदणी करणाऱ्या कोणत्याही मुतवल्ली किंवा वक्फ संस्थेवर दंड, पेनल्टी किंवा कठोर कारवाई केली जाणार नाही.' सर्वोच्च न्यायालयाने केंद्रस्तरावर मुदतवाढ देण्यास नकार दिल्यानंतर सरकारने ही पर्यायी सवलत देत लोकसंख्येतील तणाव कमी करण्याचा प्रयत्न केला आहे.यासोबतच प्रत्येक राज्याच्या वक्फ ट्रिब्यूनलला वैयक्तिक अर्जांच्या आधारे अतिरिक्त सहा महिने मुदतवाढ देण्याचा अधिकार असल्याचेही रिजिजू यांनी स्पष्ट केले. बीड लोकसभा मतदारसंघाचे खा.बजरंग सोनावणे यांनी या

▶▶ पान २ वर

## वक्फ बोर्डाची ट्रिब्युनलमध्ये धाव

### काळजी करू नका,साथ द्या,शंभर टक्के नोंदणी होईलच- अध्यक्ष समीर काझी



औरंगाबाद, (दिव्य न्युज):- महाराष्ट्रातील सर्व वक्फ अंतर्गत नोंदणीकृत असलेल्या मस्जिद, दरगाह, कब्रस्तान संस्था यांची 'उम्मीद पोर्टल' वर नोंदणी करण्याची अंतिम मुदत आज ५ डिसेंबर २०२५ पर्यंत आहे.आतापर्यंत महाराष्ट्रातील बहुतांश वक्फ संस्थांची नोंदणी पोर्टलवर झालेली आहे. मात्र अजूनही काही संस्था नोंदणी करण्याचे राहिलेल्या आहेत. त्यामुळे सबंधित संस्थांचे मुतवल्ली, ट्रस्टी आणि मुस्लिम समाजाने काळजी करू नये. घाबरून जावू नये.अफवांवर विशास ठेवू नये. वक्फ बोर्ड प्रत्येक संस्थांची नोंदणी करूनच घेणार आहे. सर्वोच्च न्यायालयाने तारीख वाढवून देण्यास नकार दिला असला तरी वक्फ ट्रिब्युनल ( वक्फ न्यायाधिकरण )मध्ये जाण्याची मुभा दिलेली आहे.

▶▶ पान २ वर




## बीड शहरात चोऱ्या होऊ नये म्हणून लावलेले सीसीटीव्ही कॅमेरेच चोरीला?

### पोलीस अन् नगरपरिषद प्रशासन झोपेतच; खरंच शहरातील कॅमेरे एसपी ऑफिसशी जोडलेले आहेत तर हे लक्षात कसे आले नाही की, फक्त प्रशासनाच्या थापा

बीड, (दिव्य न्युज):- शहरात चोरीच्या व इतर काही घटना घडू नये म्हणून चौका चौकात सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात आले आहेत. पण तेलगाव नाका चौकातील सीसीटीव्ही कॅमेऱ्याचे पोल कॅमेऱ्यासह गायब असून, याचा पोलीस प्रशासन आणि नगरपरिषद प्रशासनाला यांग पत्ता ही नाही असे दिसत आहे. तर शहरातील सर्व कॅमेरे एसपी ऑफिसशी जोडलेले असून, याचे लाईव्ह ते तिथे पाहू शकतात असा दावा आहे. पण हे कॅमेरे गायब होऊन काही महिने लोटले आहे पण याचा काही पत्ता त्यांना लागला नसल्याने कॅमेरे एसपी ऑफिसशी जोडले गेले असल्याच्या निव्वळ थापा असल्याची चर्चा शहरात सुरू झाली आहे. शहरात वाहन चोरी, घरफोडी, बाहेरील गुन्हेगारांचा वावर यासह अनेक घटना घडत असून, यावर चोवीस तास तिसऱ्या डोळ्याची नजर राहावी म्हणून कोट्यावधी रुपये खर्च करुन शासनाने बीड शहरातील चौका चौकात आणि महत्वाच्या ठिकाणी तसेच शहरात प्रवेश आणि बाहेर जाणाऱ्या मार्गांवर सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात आले आहेत. यामुळे शहरात कुठे काही ही घडले तरी पोलीस प्रशासनाला याची लगेच माहिती मिळू शकते, हे सर्व सीसीटीव्ही कॅमेरे एसपी ऑफिसशी जोडलेले आहेत असा दावा केला जात आहे. तेलगाव नाका हा शहरातील महत्वाचा प्रवेशद्वार असल्याने येथे ही नाळवंडी नाका, तेलगाव रोड व बार्शी नाका या मार्गे येणारे आणि जाणाऱ्या वाहनांवर लक्ष ठेवण्यासाठी येथील चौकात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले होते. पण येथील

▶▶ पान २ वर

# रीलस्टार तरुणी निघाली सराईत गुन्हेगार

## प्रियकरासह तिच्या ११ गुन्हे दाखल, बीड – शिरूर कासार येथे ही गुन्हा दाखल

**कोमल आणि सुजित यांनी अमरापूर-शेवगाव आणि पाथर्डी-भगूर बसमध्येही चोरी केल्याची दिली कबुली**

**कोमल काळेवर तीन गुन्हे दाखल. यापूर्वी शेवगाव, सुपा आणि बीडमधील शिरूर कासार येथे गुन्हे दाखल**

**कोमलचा प्रियकर सुजित चौधरी यांच्यावर दरोडा, जबरी चोरी आणि घरपोडी असे गंभीर आठ गुन्हे दाखल**

## कोमल काळेसह प्रियकरायला बेड्या ठोकत 9 लाखांचा मुद्देमाल जप्त

बीड : सोशल मीडियावर रील्स बनवून हवा करणारी आणि पन्नास हजाराहून अधिक फॉलोवर्स असलेली एक तरुणी प्रत्यक्षात सराईत गुन्हेगार निघाली आहे. एसटी बसमधील सहप्रवासी महिलांना लुटणाऱ्या या रील स्टार तरुणीला आणि तिच्या प्रियकराला अहिल्यानगर येथील स्थानिक गुन्हे शाखेने बेड्या ठोकल्या आहेत. कोमल नागनाथ काळे (वय 19) आणि तिचा प्रियकर सुजित राजेंद्र चौधरी (वय 25) अशी या बंटी बबलीच्या जोडीची नावे आहेत. त्यांच्याकडून सोन्याचे दागिने आणि महागडे मोबाईल असा तब्बल 9 लाख 35 हजार 320 रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. दरम्यान कोमल काळे हिच्यावर बीड जिल्ह्यातील शिरूर कासार येथेही गुन्हा दाखल आहे.



### कोमल काळे मॅडम यांनी पाथर्डी ते कल्याण एसटी प्रवासामध्ये केले कांड

● अलका मुकुंद पालवे या दिनांक 19 नोव्हेंबर रोजी पाथर्डी ते कल्याण एसटी बसणे प्रवास करत होत्या. प्रवासादरम्यान एका अनोळखी तरुणीने त्यांच्याकडील सोन्याचे दागिने आणि रोकड लंपास केली. या प्रकरणी पाथर्डी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल होता. अहिल्यानगरचे जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या सूचनेनुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांनी तपासाची चक्रे फिरवली. मिळालेल्या माहितीनुसार पोलिसांनी पाथर्डी बस स्थानक परिसरात सापळा रचून कोमल काळे हिचा शोध घेतला आणि तिला ताब्यात घेतले.

### कोमलने चोरीच्या पैशातून दीड लाखाचा आयफोन केला खरेदी

● पोलिसांनी कोमलची कसून चौकशी केली असता तिने चोरी केलेले दागिने आपल्या प्रियकर सुजित चौधरी (रा. शेवगाव) याच्याकडे दिल्याची कबुली दिली. पोलिसांनी सुजितला त्याच्या घरातून अटक केली.

● तपासात धक्कादायक माहिती समोर आली की, कोमलने चोरीच्या पैशातून 1 लाख 70 हजार रुपयांचा 'आयफोन 17 प्रो मॅक्स' आणि 15 हजार रुपयांचा ओप्पो मोबाइल खरेदी केला होता. पोलिसांनी त्यांच्याकडून 6.5 तोळे सोने, दोन मोबाईल आणि रोख रक्कम जप्त केली.

### प्रवासात महिलांनी मौल्यवान सामानाची काळजी घ्यावी, पोलिसांनी केले आवाहन

● बसने प्रवास करताना प्रवाशांनी विशेषता महिलांनी अनोळखी व्यक्तीवर विश्वास ठेवू नये आणि आपल्या मौल्यवान सामानाची काळजी घ्यावी असे आवाहन पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांनी केले आहे. ही कारवाई एलसीबीचे निरीक्षक कबाडी, सपोनी हरिश भोये आणि त्यांच्या पथकाने केली.



### कोमल काळे मॅडम आणि तिच्या प्रियकरावर एकूण 11 गुन्हे दाखल

● कोमल काळे आणि सुजित चौधरीही बंटी बबलीची जोडी सराईत गुन्हेगार असल्याचे तपासात समोर आले आहे. कोमल आणि सुजित यांनी अमरापूर–शेवगाव आणि पाथर्डी–भगूर बसमध्येही चोरी केल्याची कबुली दिली. कोमलवर यापूर्वी शेवगाव, सुपा आणि बीडमधील शिरूर कासार येथे गुन्हे दाखल आहेत. तर तिचा प्रियकर सुजित चौधरी यांच्यावर दरोडा, जबरी चोरी आणि घरपोडी असे गंभीर आठ गुन्हे दाखल आहेत. या दोघांवर मिळून एकूण 11 गुन्हे दाखल असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

पान ४ वरून

## स्विफ्ट–क्रेटा गाडीचा

आरळ ता. वसमत हे घटनास्थळीच मुत्यु पावले. तर त्यांच्या सोबतचे साईनाथ रामचंद्र काकडे रा. आरळ ता. वसमत, हरी बालासाहेब जाधव रा. पिंगळी ता. परभणी हे दोघे गंभीर जखमी झाले. त्यांना परभणी येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. घटनेची माहिती मिळताच ताडकळस पोलिसांचे सहाय्यक पोलिस निरीक्षक गजानन मोरे, रणखांब, रन्हेर, चोरघडे यांनी घटनास्थळी भेट दिली. या प्रकरणी सखाराम सटवाजी साखरे रा. आरळ ता. वसमत यांच्या फिर्यादीवरून क्रेटा कार क्रमांक एमएच २२ बीसी ७८८८ च्या चालकावर भारतीय न्याय संहिता कायद्याच्या अनुच्छेद १०६(१), २८१, १२५(अ) आणी १२५(ब) नुसार ताडकळस पोलिसांत शनिवारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास ताडकळसचे ठाणेदार सहायक पोलिस निरीक्षक गजानन मोरे हे करीत आहेत.

## राष्ट्रवादी काँग्रेस

इरफान शेख, मुझम्मील लाला, शेख आमेर, शेख अमन तसेच पक्षातील अनेक मान्यवर उपस्थित होते. सर्वांनी त्यांचे मनापासून अभिनंदन करून भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. शेख शाकेर यांनी बोलताना सांगितले की, अल्पसंख्यांक समाजाच्या हितासाठी व न्यायासाठी आवाज बुलंद करण्यासाठी मी सदैव तयार आहे. जनतेच्या विश्वासाला पात्र ठरवून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या झेंड्याखाली शहराचा विकास व समाजातील समस्या सोडवणे हा माझा प्रमुख उद्देश असेल. नियुक्तीच्या या निर्णयाने युवकांमध्ये एक नवी ऊर्जा निर्माण झाली असून आगामी काळात शहरातील अल्पसंख्यांक घटकांची राजकीय व सामाजिक शक्ती अधिक मजबूत होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

## राज्यव्यापी 'शाळा बंद'

आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सामूहिक रजा देत आंदोलनात सहभाग नोंदविला. शासन आणि प्रशासनाच्या दडपशाहीकडे दुर्लक्ष करत आंदोलन यशस्वी झाल्याचे चित्र जिल्ह्यात दिसून आले.काही ठिकाणी शिक्षकांनी काळ्या फिती बांधून शासनाचा निषेध नोंदविला.

याबाबत अधिक माहिती अशी की, राज्यात २०१३ पूर्वी नियुक्त झालेल्या शिक्षकांना 'टीईटी –सक्ती 'रद्द करावी,संच मान्यते संबंधीचा १५ मार्च ,२०२४ चा शासन आदेश रद्द करुन जुने निकष लागू करावेत, हजारों शाळा बंद पाडणारे शिक्षक व विद्यार्थ्यांचे देखिल नुकसान करणारे, शिक्षक समयोजनाचे धोरण रद्द करावे, जि. प. शिक्षकांना स्थगित केलेल्या पदोन्नती द्याव्यात, १०-२०-३० आश्वाशित प्रगती योजना लागू करावी, शिक्षण क्षेत्रातील कंत्राटी करण थांबवावे, या व अनेक प्रलंबित–दुर्लक्षित मागण्यांकडे शासन–प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी आज एक दिवस शाळा बंद आंदोलन करण्यात आले. सदरील आंदोलन करू नये यासाठी शासनाच्या वतीने दडपशाहीचे तंत्र अवलंबिले जात होते. परंतु दडपशाहीला न जुमानता बीड मधील जवळपास ४०% शाळेत शाळेतील हजारो शिक्षकांनी आंदोलन यशस्वी केले. दरम्यान शिक्षकांना बीडमध्ये शिक्षकांना मोर्चा काढण्यास पोलीस प्रशासनाने परवानगी नाकारल्यामुळे शिक्षक संघटनेच्या वतीने नाराजी व्यक्त करण्यात आली. दुपारी शिक्षक संघटनेच्या वतीने जिल्हाधिकारी यांचे मार्फत राज्याचे मुख्यमंत्री आणि शिक्षण मंत्री यांना निवेदन देण्यात आले.

शिक्षकांच्या मोर्चाला पोलिसांनी परवानगी नाकारली!

सामूहिक करायचा आंदोलनाच्या प्रसंगी बीड जिल्ह्यातील शिक्षकांनी शांततेत जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्याची परवानगी मागितली होती.

परंतु निवडणूक आचारसंहितेचे कारण करत पोलिसांनी शिक्षकांच्या मोर्चाला परवानगी नाकारली.

दडपशाहीच्या भूमिके विरोधात इशारा

काही संघटनांनी सांगितले की, मागील दोन दिवसांपासून प्रशासन दडपशाहीचे धोरण अवलंबत आहे. हीच भूमिका कायम ठेवली तर येणाऱ्या निवडणुकांमध्ये त्याचे परिणाम दिसतील, असा इशाराही नेत्यांनी दिला.

## वडवणी तालुक्याला तीन

शिक्षण, दवाखाना तसेच अनेक प्रकारचे दळणवणासाठी वडवणी शहरांत येतात.विद्यार्थ्यांचे बसस्थानक नसल्याने हाल होत असल्याचे नागरिकाने सांगितले. वडवणी गावची लोकसंख्या २५ हजारापेक्षा जास्त आहे. शाळा, महाविद्यालये, बँका, शेतकरी खोदी विक्री केंद्र, आठवडी बाजार भरतो, मात्र बसस्थानक नसल्याने नागरिकांना अडचणीचा सामना करावा लागत आहे. वडवणी तालुक्यातील महिलांना, वृद्धांना विद्यार्थ्यांना ऊन, पावसात उभं रहावं लागतं. त्यामुळे वडवणी शहरात बस स्थानक उभा करावा अशी मागणी होत आहे परंतु स्थानिक लोकप्रतिनिधी मूग गिळून गप्प आहेत. तालुक्यातील गावातून आलेले विद्यार्थी शेतकरी विशेषता मुली वृद्ध नागरिक, महिला, व्यापारी वडवणीला सकाळी आले की संध्याकाळपर्यंत त्यांच्या बस नसल्याने ना विलाजास्तव रस्त्यावर दिवस काढावा लागत असल्याचे दिसून येत आहे. त्यातूनच मुलीना छेडछाडीचे प्रकार होत आहे. तसेच प्रवाशांच्या लघुशंकेसाठी कसलीही सोय नसल्याने महिलांना व मुलींना मोठा सामना करावा लागत असल्याने समजते. स्वर्गीय गोपीनाथ मुंडे साहेब यांनी केलेल्या तालुक्याला कधी बसस्थानक मिळेल याची नागरिकांतून मागणी होत आहे. प्रशासन व लोकप्रतिनिधींनी हा प्रश्न मार्गी लावावा अशी नागरिकां कडून मागणी आहे.

पान १ वरून

## निकालाला पाच

पण सरकारने दिलेली जमीन अयोध्येपासून सुमारे २५ किलोमीटर अंतरावर असलेल्या सोहावल तहसीलमधील धन्नीपूर गावात आहे.आरटीआय कार्यकर्ते ओम प्रकाश सिंह म्हणाले, अयोध्या शहराच्या हद्दीत जमीन देण्याचा आदेश होता, परंतु जमीन २५ किलोमीटर अंतरावर असलेल्या धन्नीपूरमध्ये देण्यात आली आहे. मी यावर आरटीआय दाखल केला आहे.अयोध्येतील स्थानिक लोकांचं असं म्हणणं आहे की, सामान्य लोक इतक्या दूर असलेल्या मशिदीत नमाज अदा करण्यासाठी जाणार नाहीत.अंजुमन मुहाफिज मस्जिद व मकाबीर कमिटी अयोध्याचे सरचिटणीस मोहम्मद आझम कादरी म्हणाले, अयोध्येतील लोक नमाज अदा करण्यासाठी २५ किलोमीटर दूर जाणार नाहीत. सर्वोच्च न्यायालयानं स्पष्टपणे सांगितलं होतं की, जमीन नगरपालिका हद्दीत किंवा जवळ द्यावी, परंतु त्या आदेशाची अवहेलना करण्यात आली.अयोध्येतील स्थानिक लोकांचं असं म्हणणं आहे की सामान्य लोक इतक्या दूर असलेल्या मशिदीत नमाज अदा करण्यासाठी जाणार नाहीत.

ते पुढे म्हणतात, सरकारला हवं असतं, तेव्हा ते विकास घडवून आणू शकतात. राम मंदिर हे त्याचं एक उदाहरण आहे. जर सरकारला हवं असतं, तर मशीदही बांधता आली असती.मात्र, सुन्नी वक्फ बोर्डाचे अध्यक्ष झुफर अहमद फारुकी म्हणतात, त्यावेळी सर्वांनी हा निर्णय स्वीकारला. त्यामुळे, अधिग्रहित केलेल्या जमिनीबद्दल कोणताही प्रश्नच उद्भवत नाही. धन्नीपूरमध्ये मुस्लीम लोकसंख्या आहे आणि लोक तिथे नमाज अदा करतील.स्थानिक पत्रकार इंदू भूषण पांडे म्हणाले, धन्नीपूरच्या या भागात आधीपासूनच एक डझनहून अधिक मशिदी आहेत. सर्वोच्च न्यायालयानं मशिदीसाठीची जमीन ही धन्नीपूरच्या लोकांना नाही तर अयोध्येच्या लोकांना दिली होती.बाबरी मशीद वादातील पूर्वीचे वादी इक्बाल अन्सारी यांचा दृष्टिकोन वेगळा आहे.ते म्हणतात, सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय संपूर्ण देशाने स्वीकारला आणि आम्हीही तो स्वीकारला. आमचा धर्म हेच सांगतो की, तुम्ही ज्या देशात राहता त्या देशातील कायद्यांचं पालन करा.पुढे ते म्हणतात की, वाद घालण्यात काही अर्थ नाही; कारण जिथे जमीन मिळाली आहे, तिथे मशिदी देखील आहेत.

मशिदीचा नकाशा रद्द

२०२० मध्ये, सरकारने लखनौ–अयोध्या महामार्गावरील रौनही पोलीस स्टेशनपासून अंदाजे २०० मीटर अंतरावर मशिदीसाठी ५ एकर जमीन वाटप केली होती.मशिदीच्या जागेजवळ एक प्राचीन दर्गा देखील आहे, जो ऐतिहासिक असल्याचा दावा केला जातो.ट्रस्टने मशीद आणि तिच्या परिसरासाठी सविस्तर आराखडा तयार केला होता, परंतु बांधकाम अद्याप सुरू झालेलं नाही.

मशिदीचा जुना आराखडा लोकांनी नाकारला.

यावर उत्तर देताना, अयोध्या विकास प्राधिकरणानं म्हटलं, ट्रस्टने अग्निशमन विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि वन विभागासह १४–१५ विभागांकडून आवश्यक एनओसी सादर न करण्यात आल्यामुळे हा नकाशा रद्द करण्यात आला आहे.पण ट्रस्टचाही स्वतःचा युक्तिवाद आहे. अध्यक्ष झुफर अहमद फारुकी म्हणाले, आम्ही नवीन योजनेसह, सुरुवातीपासूनच नवी मशीद बांधणार होतो. म्हणून कोणत्याही विभागाकडून एनओसी मागितली गेली नाही.अयोध्या विकास प्राधिकरणाचे उपाध्यक्ष अनुराग जैन यांनी या प्रकरणाबद्दल आपण अनभिज्ञ असल्याचं सांगितलं आणि त्यावर भाष्य करण्यास नकार दिला.

ट्रस्टने आता मशिदीसाठी घुमटाच्या आकाराचं एक नवीन डिझाइन तयार केलं आहे. नवीन नकाशा ३१ डिसेंबरपर्यंत अयोध्या विकास प्राधिकरणाकडे सादर केला जाईल, असा दावा ट्रस्टने केला.मशिदीची नवीन रचना जवळजवळ तयार झाली आहे. ही मशीद १४०० चौरस मीटर क्षेत्रात बांधली जाईल आणि उर्वरित संकुल नंतर विकसित केलं जाईल, अशी माहिती फारुकी यांनी दिली.

'फक्त मीडियाचे लोक येतात'

या विलंबामुळे धन्नीपूरच्या रहिवाशांमध्ये गोंधळ निर्माण झाला आहे. गाव आणि आजूबाजूच्या परिसरातील रहिवासी या विषयावर चर्चा करण्यास कचरताना दिसतात.धन्नीपूर गावात मिठाईचे दुकान चालवणारे माजिद म्हणतात, सुरुवातीला खूप उत्साह होता, पण आता विचारायलाही कोणी नाही. आता आम्ही ऐकतो की, सर्व काही रद्द झालं आहे. बोर्डाचे सदस्यही आता येत नाहीत.गावाकडे येणाऱ्या–जाणाऱ्या अनेक लोकांशी बोलण्याचा प्रयत्न केला, तेव्हा लोकांनी सांगितलं की, धन्नीपूर गावातच दोन मशिदी आहेत.तिथून जाणारे नेहल अहमद म्हणाले, फक्त मीडियाचे लोक येतात आणि त्यांना उत्तरं देऊन आम्ही थकलो आहोत. फक्त गुरुवारीच यात्रेकरू दर्ग्यात येतात.प्रस्तावित मशिदीसाठी आता एक नवीन नकाशा तयार करण्यात आला आहे.

मंदिर बांधल्यानंतर मशीद बांधण्यास झालेल्या विलंबाबद्दल विरोधी पक्ष सरकारवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत आहेत. समाजवादी पक्षाचा आरोप आहे की, या सरकारचा दृष्टिकोन सुरुवातीपासूनच भेदभावपूर्ण आहे.पक्षाचे प्रवक्ते मोहम्मद आझम म्हणाले, सर्वोच्च न्यायालयानं म्हटलं होतं की, अयोध्येतील एका प्रमुख ठिकाणी या मशिदीसाठी जागा देण्यात यावी, परंतु सरकारने ती जागा २० किलोमीटर अंतरावर दिली. सुन्नी सेंट्रल वक्फ बोर्ड सरकारी यंत्रणेसारखं काम करत आहे आणि मशीद बांधण्यात सुस्तपणा दाखवत आहे.यावर भाजपचं असं म्हणणं आहे की, सरकारचा या संपूर्ण प्रकरणाशी काहीही संबंध नाही. भाजपच्या अल्पसंख्याक सेलचे अध्यक्ष कुंवर बसीत अली म्हणाले, लोक मंदिराबद्दल उत्साही होते, पण मशिदीबद्दल तो उत्साह दिसत नाही. लोकांचं सहकार्य मिळत नाहीये आणि वक्फ बोर्ड सतत प्रयत्न करत आहे.

ट्रस्टमधील लोकदेखील निधीच्या कमतरतेबद्दल तक्रार करत आहेत आणि लोक देणगी देण्यात रस दाखवत नसल्याचा दावा करत आहेत.२०२४ मध्ये मुंबईत ट्रस्टची बैठक झाली. त्यामध्ये १५० हून अधिक लोक उपस्थित होते. मशिदीच्या आराखड्यावरून मतभेद झाल्यामुळे मशिदीची रचना बदलण्याचा निर्णय घेण्यात आला.जुफर फारुकी म्हणाले, लोकांनी पहिल्या डिझाइनवर आक्षेप घेतला आणि म्हटलं की, हे एखाद्या कॉम्प्लेक्ससारखं दिसतंय. म्हणूनच घुमटाच्या आकाराचं डिझाइन तयार करण्यात आलं. मुस्लीम समाजात असा समज होता की, जुनी डिझाइन मशिदीसारखी दिसत नाहीये, म्हणून मग आम्ही ती बदलली.

या मशिदीचं नाव 'मोहम्मद बिन अब्दुल्ला' असं ठेवण्यात आलं आहे. हे पैगंबर मुहम्मद यांचं नाव आहे. मशीद प्रथम बांधली जाईल आणि त्यानंतर इतर प्रकल्प उभारले जातील.एडीएनं नकाशा मंजूर केल्यानंतर मशिदीसाठी देणग्या गोळा करण्याची ट्रस्टची योजना आहे. ट्रस्टचं असं म्हणणं आहे की, यामध्ये कोणतेही कायदेशीर अडथळे नाहीत आणि सरकारकडूनही कोणताही दबाव नाही.ट्रस्टने जमिनीवर एक हॉस्पिटल आणि एक कम्यूनिटी किचन बांधण्याचीही योजना आखली आहे, परंतु सध्या तरी हे सगळं काही कागदावरच आहे.

## बीड शहरात चोऱ्या

सीसीटीव्ही कॅमेरे असलेलं पोलच कॅमऱ्यासह गायब आहे. याला काही महिने उलटून गेले आहे. पण हे कॅमेरे काही बसविण्यात आले नाही. यामुळे पोलीस आणि नगरपरीषद प्रशासन झोपेतच दिसत आहे. तसेच हे कॅमेरे एसपी ऑफिसशी जोडलेले असेल आणि त्यांना लाईव्ह दिसत असेल तर हा प्रकार त्यांच्या लक्षात कसा आला नाही असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. तसेच लक्षात आले तर त्यांनी काय उपाययोजना केली अन् ते कॅमेरे काढून ठेवले असतील तर अद्याप पर्यंत बसविण्यात का आले नाही असे एकना अनेक प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

रस्त्याचे काम सुरू असल्याने काढले असेल तर त्या बाजूचे काम पूर्ण झाले आहेनांदेड–नगर या राष्ट्रीय महामार्गाचे काम मागील दोन वर्षांपासून शहरात सुरू आहे. या रस्त्याच्या मध्ये हे सीसीटीव्ही कॅमेऱ्याचा पोल येत असेल म्हणून काढला असेल तर हा ज्या ठिकाणी सीसीटीव्ही होते तेथील काम पूर्ण झाले आहे. तसेच त्यास लागून असलेला विद्युत पोल दोनवेळा बदलून लगेच लावण्यात आला. मग या सीसीटीव्ही कॅमेऱ्याचा पोल का लावण्यात आला नाही? असा प्रश्न उपस्थित होतो आहे. काम पूर्ण झाले असल्याने आता कधी बसवणार असा प्रश्न विचारला जात आहे.

## शिक्षक व शिक्षकेत्तर

वेतन श्रेणी लागू करावी, शिक्षकांनाही १०, २०, ३० वर्षांनंतरची सुधारीत तीन वेतन लाभाची ओशासित प्रगती योजना लागू करावी,१५ मार्च २०२४ चा संचमान्यता विषयक शासन निर्णय रद्द करावा, राज्यातील शिक्षकेत्तर कर्मचारी यांची बंद असलेली पदभरती तात्काळ सुरू करावी, विषय पदविधर शिक्षकांना पदवीधर वेतनश्रेणी मध्ये भेदभाव न करता मंजुरी द्यावी इ. मागण्यांसाठी महाराष्ट्रातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी आंदोलन केले आहे. महाराष्ट्रात बहुतांश ठिकाणी शनिवारी (दि.०५) रोजी शाळाही बंद ठेवण्यात आलेल्या आहेत. विविध प्रलंबित मागण्यांसाठी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी हे गेल्या अनेक दिवसांपासुन विविध माध्यमातुन आंदोलन करत आहेत. शिक्षक हा समाजाचा मार्गदर्शक घटक आहे. त्यामुळे शासनाने त्यांच्या मागण्यांचा संवेदनशीलपणे आणि सकारात्मकपणे विचार करावा असे आ.संदिप क्षीरसागर यांनी म्हटले आहे. या संदर्भात आ.क्षीरसागर यांनी मुख्यमंत्री तसेच शालेय शिक्षणमंत्री यांच्याशी पत्रव्यवहार केला आहे.

## खा.सोनवणेंनी प्रश्न

मुदतवाढीसाठी सातत्याने पाठपुरावा केला होता. दिल्लीमध्ये मंत्र्याची वारंवार भेट घेऊन मुदतवाढ किंवा दंडमुक्ती देण्याचा आग्रह त्यांनी धरला होता. अखेर त्यांच्या तसेच विविध खासदार, वक्फ बोर्ड सदस्य व सामाजिक संस्थांच्या प्रयत्नांना यश मिळाले.

सोनावणे म्हणाले, 'देशातील लाखो मुतवल्लयांसाठी हे मोठे समाधान आहे. केंद्र सरकारने समुदायाच्या भावना लक्षात घेत घेतलेला हा निर्णय कौतुकास्पद आहे.

आतापर्यंत झालेली नोंदणी

१ देशभरात अंदाजे ९ लाख वक्फ मालमत्तांपैकी १.५१ लाखांहून अधिक मालमत्तांची नोंदणी उम्मीद पोर्टलवर पूर्ण झाली आहे. कर्नाटक, पंजाब, जम्मू–काश्मीर, उत्तर प्रदेश आणि बिहारसारख्या राज्यांनी उल्लेखनीय प्रगती केली आहे.२ अल्पसंख्यक कल्याण मंत्रालयाचे हे अधिकृत डिजिटल व्यासपीठ असून वक्फ मालमत्तांचे जिओ–टॅगिंग, कागदपत्र पडताळणी आणि पारदर्शक व्यवस्थापन यासाठी ते वापरले जाते.

कायद्याची पार्श्वभूमी

वक्फ (दुरुस्ती) कायदा २०२५ याच वर्षी मंजूर झाला. नोंदणीसाठी दिलेली सहा महिन्यांची मुदत ६ जून २०२५ ते ५ डिसेंबर २०२५ अशी होती. सर्वोच्च न्यायालयाने मुदतवाढ न दिल्याने समुदायामध्ये अनिश्चितता निर्माण झाली होती. आजच्या घोषणेने ही स्थिती निवळली आहे.

उम्मीद पोर्टल हे वक्फ मालमत्तांचे जिओ–टॅगिंग, कागदपत्र पडताळणी व पारदर्शक व्यवस्थापनासाठी सरकारने तयार केलेले अधिकृत डिजिटल प्लॅटफॉर्म आहे. या निर्णयामुळे लाखो मुतवल्लींच्या अडचणी दूर होणार आहेत. मी केंद्र सरकार व मंत्री किरण रिजिजू यांचे मन:पूर्वक आभार मानतो. या विशेष सवलतीचा लाभ घ्या आणि पुढील तीन महिन्यांत आपल्या मालमत्ता नोंदणी पूर्ण करा.–खा.बजरंग सोनवणे, बीड.

## वक्फ बोर्डाच

महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्डाने ट्रिब्युनल कोर्टात धाव घेतली असून तिथे नक्कीच न्याय मिळेल आणि उम्मीद पोर्टलवर नोंदणीसाठी मुदतवाढ मिळेल असा विशास महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्डाचे अध्यक्ष समीर काझी यांनी व्यक्त केला आहे. राज्यातील प्रत्येक वक्फ संस्थांची नोंदणी झाल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही असेही अध्यक्ष काझी यांनी सांगितले. भारतात वक्फ संस्थांच्या नोंदणीत महाराष्ट्र राज्य दुसऱ्या क्रमांकावर आहे. उम्मीद पोर्टलवर वक्फ संस्थांची नोंदणी करण्यासाठी ५ डिसेंबर २०२५पर्यंत मुदत देण्यात आली होती. या कालावधीत बीडसह महाराष्ट्रातील बहुतांश वक्फ संस्थांनी नोंदणी केली असली तरी रेकॉर्ड उपलब्ध नसणे किंवा इतर कागदपत्रा अभावी अनेकांना नोंदणी करता आली नाही. सर्व कागदपत्र एकाच वेळी उपलब्ध करण्यासाठी अडचणी येत आहेत. त्याचबरोबर उम्मीद पोर्टल वरील तांत्रिक अडचणी देखील त्यासाठी कारणीभूत ठरू लागले आहेत. उम्मीद पोर्टल वरील नोंदणीसाठी मुदतवाढ मिळावी अशी मागणी करणारी याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आली होती. न्यायालयाने वक्फ न्यायधिकारणाची केंद्र सरकारला नोटीस,दहा डिसेंबरपर्यंत जबाब दाखल करा सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार आज तातळीने महाराष्ट्र वक्फ बोर्डाने वक्फ न्यायाधिकरण कडे धाव घेतली.न्यायधिकारणाने या वर तातळीने सूनवाई घेत केंद्र सरकारला नोटीस बजावत दहा डिसेंम्बर पर्यंत जबाब दाखल करण्याचे निर्देश दिले नोटिशीत वेळ का वाढवून देऊ नये,म्हणून दहा डिसेंम्बर पर्यंत जबाब दाखल करा,असा निर्देश दिल.न्यायधिकारणाच्या नोटीस मुळे वेळ वाढवून मिळण्याची शक्यता असून या मुळे मोठा दिलासा ही मिळाला आहे. संभ्रम बाळगू नका, वेळ वाढवून मिळाली नाही आज दिवस भर टीव्ही व सोशियाल मीडियावर केंद्रीय अपल्पसंख्यांक मंत्री किरण रिजिजू यांचे एक वक्तव्य समोर आले.त्यात यांनी मुतवल्लींना सरसकट दिलासा माळेला नाही मात्र न्यायाधिकरण कडून वेळ वाढवून मिळण्याची अपेक्षा आहे. जे न्यायधिकारणात जाणार त्यांना पेनल्टी लावली जाणार नाही म्हणून सांगितले.तसेच पोर्टलवर अपलोड करण्यास वेळ वाढवून न देता ज्या संस्था अपलोड केल्या गेल्या,त्यांचा चेकर व अप्रोवल साठी पुढील तीन महिन्याचा कालावधी ठरवून देण्यात आला. असे असले तरी काही जणांनी सोशियाल मेडिया वर वेळ वाढवून दिल्याच्या बातम्या पसरविला म्हणून संभ्रम न बाळगता वेळेत संस्था अपलोड करण्याचे बंधनकारक असल्याचे वक्फ बोर्डाचे अध्यक्ष समीर काझी यांनी खुलासा केला.